# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र. २४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at: http://mpcb.gov.in
Email: pso@mpcb.gov.in

महाराष्ट्र

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२

क्रमांक: मप्रनि/प्रवैअ /ब - 2111141fts 0124 दिनांक 11/11/2021

**विषय: -वैद्यकीय आस्थापनांना म.प्र.नि. मंडळाचे संमतीपत्र (कन्सेंट) आणि प्राधिकारपत्र (ऑथोरायझेशन) तसेच सामाईक प्रक्रिया केंद्राची सभासद नोंदणी घेणे बंधनकारक असल्याबाबत.**

**संदर्भ:** - १. जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६

२. विधानपरिषद सन २०१७ पावसाळी अधिवेशन, आश्वासन क्रमांक -१३२

.........

जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अन्वये राज्यातील सर्व वैद्यकीय आस्थापना यांना प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र व जैव वैद्यकीय कचरा प्राधिकारपत्र (Consent & BMW Authorization), तसेच सामाईक प्रक्रिया केंद्राची सभासद नोंदणी घेणे बंधनकारक आहे.

त्याअनुषंगाने म.प्र.नि. मंडळाचे वैद्यकीय आस्थापनांना म.प्र.नि. मंडळाचे संमतीपत्र (कन्सेंट) आणि प्राधिकारपत्र (ऑथोरायझेशन) तसेच सामाईक प्रक्रिया केंद्राची सभासद नोंदणी घेणे बंधनकारक असल्याबाबतचे परिपत्रक आपल्या माहितीसाठी सोबत जोडण्यात आले आहे.

तरी आपणास सूचित करण्यात येते कि आपल्या अखत्यारीतील संबंधित विभागांस याबाबत अवगत करण्यात यावे व परिपत्रकानुसार जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ तरतुदींचे पालन करण्यासाठी योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.

( डॉ. अमर सुपाते )
**प्रधान वैज्ञानिक अधिकारी**

जोडपत्र: - परिपत्रक

प्रति,

१) जिल्हा शल्यचिकित्सक
२) जिल्हा आरोग्य अधिकारी
३) वैद्यकीय अधिकारी (महानगरपालिका )
४) उप प्रादेशिक अधिकारी , म.प्र.नि. मंडळ
५) सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्र

प्रत माहितीस्तव सादर:

१) माननीय. अध्यक्ष, म.प्र.नि. मंडळ, शीव, मुंबई.

२) सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, शीव, मुंबई.

प्रत:

१) मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
२) मा. सचिव वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,संचालनालय
३) मा. प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
४) मा. संचालक ,सार्वजनिक आरोग्य विभाग
५) मा. जिल्हाधिकारी / मा. आयुक्त महानगरपालिका
६) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
७) प्रादेशिक अधिकारी - संबंधितांस उप प्रादेशिक अधिकारी यांच्यामार्फत अथवा ई-मेल द्वारे प्रत पाठवण्यात यावी

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र. २४०१०४३७/२४०२०७८१
Visit us at: http://mpcb.gov.in
Email: pso@mpcb.gov.in

"आपली सेवा आमचे कर्तव्य"

कल्पतरु पॉईंट, २ रा मजला,
शीव माटुंगा स्किम रोड क्र. ८
शीव सर्कलसमोर, शीव (पूर्व)
मुंबई - ४०० ०२२

क्रमांक: मप्रनि/प्रवैअ /ब - 211111 FTS 0124 दिनांक 11 / 11 / 2021

## परिपत्रक

**विषय: -वैद्यकीय आस्थापनांना म.प्र.नि. मंडळाचे संमतीपत्र (कन्सेंट) आणि प्राधिकारपत्र (ऑथोरायझेशन) तसेच सामाईक प्रक्रिया केंद्राची सभासद नोंदणी घेणे बंधनकारक असल्याबाबत.**

**संदर्भ**: - १. जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६

२. विधानपरिषद सन २०१७ पावसाळी अधिवेशन, आश्वासन क्रमांक -१३२

........

राज्यातील सर्व सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्र, वैद्यकीय आस्थापना यांना खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे,

**१. सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्र -**

राज्यात कार्यरत असणाऱ्या सर्व सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांनी त्यांच्या कडे नोंदणी केलेल्या वैद्यकीय आस्थापनांची सभासद नोंदणी कालावधी समाप्त झाल्यानंतर म.प्र.नि. मंडळाकडून जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थानाकारीता वैध जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्र व समंतीपत्र सादर केल्या नंतरच अशा आस्थापनांची सभासद नोंदणीचे नूतनीकरण करावे व अशा वैद्यकीय आस्थापनांची माहिती संबंधित उप प्रादेशिक अधिकारी यांस दरमहा आवश्यक कार्यवाहीसाठी सादर करावी. या तरतुदीचे पालन न करणाऱ्या सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांवरती मंडळाने आवश्यकतेनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

ज्या वैद्यकीय आस्थापना पहिल्यांदा सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांची सभासद नोंदणी घेणार आहेत अशा आस्थापनांना १ वर्ष केवळ तात्पुरत्या स्वरूपाची (Provisional) सभासद नोंदणी (Membership) देण्यात यावी. अशा प्रकारची सभासद नोंदणी बॉम्बे नर्सिंग होम नोंदणी आणि म.प्र.नि. मंडळाकडून वैध जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्र व समंतीपत्र प्राप्त केल्यानंतरच नियमित करण्यात यावी आणि जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थाना करिता प्राधिकृत केल्यानुसार वैद्यकीय कचरा स्वीकारावा तसेच जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नियम क्र. १३ मधील तरतुदीनुसार संबंधित वैद्यकीय कचरा व्यवस्थापनाचे वार्षिक अहवाल प्रतिवर्षी ३० जानेवारी पर्यंत सर्व सभासदांना विनामूल्य प्रमाणित करून देण्यात यावेत.

**२. वैद्यकीय आस्थापना -**

म.प्र.नि. मंडळाकडून जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थाना करिता जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांची सभासद नोंदणी व बॉम्बे नर्सिंग होम नोंदणी, तसेच रुग्णालयातून निर्माण होणाऱ्या सांडपाणी आणि /अथवा हवा प्रदूषण करणाऱ्या यंत्रणा इ.करिता जल प्रदूषण (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण), कायदा, १९७४, हवा प्रदूषण (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण ), कायदा , १९८१ अंतर्गत अनुक्रमे जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्र (ऑथोरायझेशन ) आणि संमतीपत्र (कन्सेंट) घेणे व वैध असणे बंधनकारक आहे. संमतीपत्र (कन्सेंट) आणि प्राधिकारपत्र (ऑथोरायझेशन) न घेणाऱ्या आस्थापनांविरुद्ध म.प्र.नि. मंडळाकडून दंडात्मक व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येईल.

**३. जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी-**

बॉम्बे नर्सिंग होम नोंदणी कायदा,१९४९ अंतर्गत प्रथम नोंदणीवेळी जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्राकडून सभासद नोंदणी करणे तसेच म.प्र.नि. मंडळाचे कन्सेंट टू एस्टॅब्लिश घेणे आवश्यक आहे त्या आधारे बॉम्बे नर्सिंग होम कायदा ,१९४९ अंतर्गत वैद्यकीय आस्थापनांची नोंदणी करण्यात यावी. बॉम्बे नर्सिंग होम कायदा ,१९४९ अंतर्गत नूतनीकरण करताना संबंधित वैद्यकीय आस्थापनेकडे म.प्र.नि. मंडळाचे वैध संमतीपत्र (कन्सेंट) आणि प्राधिकारपत्र (ऑथोरायझेशन ) असल्याची खात्री करावी. सदरबाबत त्रुटी असल्यास आवश्यक ती कार्यवाही करावी.

**(श्री. अशोक शिनगारे, भा. प्र. से.)**

**सदस्य सचिव**

प्रत माहितीस्तव सादर: माननीय. अध्यक्ष, म.प्र.नि. मंडळ, शीव, मुंबई.

प्रत: १) मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

२) मा. सचिव वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन,संचालनालय

३) मा. प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

४) मा.संचालक ,सार्वजनिक आरोग्य विभाग

५) मा.जिल्हाधिकारी / मा. आयुक्त महानगरपालिका

६) जिल्हा शल्य चिकित्सक / जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद

७) प्रादेशिक अधिकारी / उप प्रादेशिक अधिकारी , म.प्र.नि. मंडळ

८) सर्व संबंधित सामाईक जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्रकल्प ,महाराष्ट्र राज्य